**सुविचार**

संसार में समस्यायें बढेंगी इसलिए मुझे समस्याओं का सामना करने की अपनी क्षमता को बढाना चाहिए ।

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक
# यशवंत

✦लातूर/धाराशिव/बीड/नांदेड ✦/बुधवार दि. २२ मे २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१८५ ✦पृष्ठे८✦किंमत १रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦


# राज्याचा बारावीचा निकाल ९३.३७ टक्के

पुणे : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या इयत्ता बारावी परीक्षेचा निकाल जाहीर करण्यात आला आहे. राज्याचा निकाल ९३.३७ टक्के एवढा लागला आहे.

मागील वर्षाच्या तुलनेत यंदा निकालात २.१२ टक्क्यांनी वाढ झाली आहे. यंदाही निकालात मुलांपेक्षा मुलीच अव्वल ठरल्या आहेत. बारावीची लेखी परीक्षा २१ फेब्रुवारी ते २३ मार्च या कालावधीत घेण्यात आली. या परीक्षेसाठी तब्बल १५ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. गेल्या वर्षी राज्य मंडळाने बारावीच्या परीक्षेचा निकाल २५ मे रोजी जाहीर केला होता. यंदा त्या तुलनेत चार दिवस आधीच निकाल जाहीर करण्यात आला आहे. राज्य मंडळाचे अध्यक्ष शरद गोसावी यांनी पत्रकार परिषद घेऊन निकाल जाहीर केला आहे. यावेळी सचिव अनुराधा ओक, सहसचिव माणिक बांगर उपस्थित होते. राज्यात कोकण विभागाचा सर्वाधिक निकाल ९७.५१ टक्के. सर्वांत कमी निकाल (९१.९५ टक्के) मुंबई विभागाचा लागला आहे. मुलींची टक्केवारी ९५.४४, मुलांची टक्केवारी ९१.६०. मुलींचा निकाल मुलांपेक्षा ३.८४ टक्क्यांनी अधिक आहे.

**विभागनिहाय निकाल**

| | |
|---|---|
| पुणे | ९४.४४ |
| नागपूर | ९२.१२ |
| संभाजीनगर | ९४.०८ |
| मुंबई | ९१.९५ |
| कोल्हापूर | ९४.२४ |
| अमरावती | ९३ |
| नाशिक | ९४.७१ |
| लातूर | ९२.३६ |
| कोकण | ९७.५१ |

# कोण आहे पंतप्रधान मोदींचा राजकीय उत्तराधिकारी? स्वत: केला खुलासा



पाटणा : लोकसभा निवडणुकीसाठी राज्यात पूर्णपणे मतदान पार पडलं असून देशात दोन टप्प्यांतील मतदान बाकी आहे. शेवटच्या टप्प्यात आलेल्या या निवडणुकीमुळे राजकीय वातावरण चांगलंच तापलं आहे. सत्ताधारी आणि विरोधकांमध्ये आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडत आहेत. त्यातच दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची जामिनावर सुटका झाल्यानंतर त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर टीका केली होती. लोकसभा निवडणुकीच्या निकालानंतर दोन महिन्यांनी मोदी पंतप्रधानपदाचा राजीनामा देतील आणि अमित शाह पंतप्रधान होतील, असं ते म्हणाले होते. त्यामुळे मोदींनंतर राजकीय उत्तराधिकारी कोण? असा प्रश्न राजकीय वर्तुळात निर्माण झाला होता. याबाबत खुद्द पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खुलासा केला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज बिहारमधील महाराजगंज येथील एका सभेला संबोधित करताना या प्रश्नाचं उत्तर दिलं आहे. ते म्हणाले की, माझा उत्तराधिकारी कोणीही नाही. या देशातील जनताच माझी उत्तराधिकारी आहे. बिहारच्या सभेत बोलताना पंतप्रधान मोदींनी काँग्रेस आणि आरजेडीवर जोरदार हल्ला चढवला. ते म्हणाले, काँग्रेस पक्ष आज तुकडे तुकडे टोळीला प्रोत्साहन देण्यासाठी काम करत आहे. बिहारमधील (पान ३ वर)

# ट्रक-बस ड्रायव्हरला जी शिक्षा ती पोर्श चालवणा-या मुलाला का नाही?



मुंबई : पुण्यातील भरधाव कार दुर्घटनेप्रकरणी दोघांचा जीव गेल्यानंतर आता त्यावर काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांनीदेखील प्रतिक्रिया देत पंतप्रधान नरेंद्र मोदींवर टीका केली आहे. नरेंद्र मोदी हे दोन भारत निर्माण करत आहेत, ज्या ठिकाणी न्याय ही गोष्टदेखील श्रीमंतांची गुलाम झाली आहे असा सणसणीत आरोप राहुल गांधींनी केला. ट्रक ड्रायव्हर किंवा इतरांना जो न्याय दिला जातो तोच न्याय या पुण्यातील धनाड्याच्या मुलाला का दिला गेला नाही असा सवालही त्यांनी विचारला आहे.

बस ड्रायव्हर, ट्रक ड्रायव्हर , ओला, उबेर ड्रायव्हर, ऑटो ड्रायव्हर यांच्याकडून जर काही चूक झाली आणि अपघातात कुणाचा चुकून मृत्यू झालाच तर त्यांना दहा वर्षांची शिक्षा ठोठावली जाते. त्याचसोबत त्यांच्याकडून चावी घेऊन ती फेकली जाते. पण जर श्रीमंत घरातील १६-१७ वर्षांचा मुलगा जर दारू पिऊन दोन लोकांची हत्या करतो, तर त्याला सांगितले (पान ३ वर)

# किर्गिजस्तानात हिंसाचार; संभाजीनगर, धाराशिव, बीडचे ५०० विद्यार्थी अडकले

नवी दिल्ली : किर्गिजस्तानात सध्या भारत आणि पाकिस्तानी विद्यार्थ्यांवर स्थानिक विद्यार्थ्यांकडून हल्ले केले जात आहेत. यामध्ये आत्तापर्यंत ४ पाकिस्तानी विद्यार्थ्यांची हत्या करण्यात आली. दरम्यान, वैद्यकीय शिक्षणानिमित्त या देशात महाराष्ट्रातील मराठवाडा अन् पश्चिम महाराष्ट्रातील ५०० हून अधिक विद्यार्थी अडकून पडले आहेत. त्यामुळे त्यांच्या सुरक्षेच्या कारणास्तव सर्व विद्यार्थ्यांची परीक्षा ऑनलाईन घेण्याचा निर्णय स्थानिक प्रशासनाने घेतला आहे.

किर्गिजस्तानमध्ये सध्या सुरु असलेल्या हिंसाचाराचा महाराष्ट्रातल्या विद्यार्थ्यांना फटका बसला आहे. यामध्ये मराठवाडा, पश्चिम महाराष्ट्रातील ५०० हून अधिक विद्यार्थी किर्गिजस्तानमध्ये अडकले आहेत, पण ते सर्वजण सुरक्षित असल्याची माहिती मिळते आहे. वैद्यकीय शिक्षणासाठी ५०० पेक्षा जास्त विद्यार्थी सध्या महाराष्ट्रातून किर्गिजस्तानमध्ये वास्तव्यास आहेत.

यामध्ये संभाजीनगर, धाराशिव आणि बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचा समावेश आहे. या विद्यार्थ्यांच्या सध्या परीक्षा सुरु आहेत, त्यातच हिंसाचाराच्या घटना सुरु झाल्याने स्थानिक प्रशासनाने भारतीय आणि पाकिस्तानी विद्यार्थ्यांच्या परीक्षा ऑनलाईन घेण्यास परवानगी दिली आहे. दरम्यान, परीक्षेनंतर जुनमध्ये सर्व विद्यार्थी भारतात परतण्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे.

किर्गिजस्तानमधील पाकिस्तानी युवक आणि स्थानिक युवकांमध्ये वाद झाल्याने हिंसाचार भडकल्याचे सांगितले जात आहे. हा वाद इतका विकोपाला गेला आहे की, यामध्ये आत्तापर्यंत ४ पाकिस्तानी विद्यार्थ्यांची हत्या करण्यात आली आहे.

# एसआयटी करणार स्वाती मालीवाल प्रकरणाचा तपास



नवी दिल्ली : आम आदमी पार्टीच्या राज्यसभा खासदार स्वाती मालीवाल यांच्यावर झालेल्या हल्ल्याप्रकरणी एक मोठी माहिती समोर आली आहे. या हल्ल्याच्या तपासासाठी आता दिल्ली पोलिसांचे विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात आले आहे. तत्पूर्वी सोमवारी संध्याकाळी दिल्ली पोलिसांचे पथक बिभव कुमार यांच्यासोबत मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी पोहोचले होते. यावेळी उत्तर जिल्ह्याचे अतिरिक्त पोलिस उपायुक्त अंजिता चिपियाना यांच्यासह अनेक वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

पोलिस अधिका-याने सांगितले की, स्वाती मालीवाल प्रकरणात विशेष तपास पथक (एसआयटी) स्थापन करण्यात आली आहे. आठवड्याभरापूर्वी आम आदमी पक्षाच्या राज्यसभा खासदार स्वाती मालीवाल यांना मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांचे पीए बिभव कुमार यांनी मारहाण केली होती. यानंतर बिभवला अटक करण्यात आली असून, पोलिसांनी केजरीवाल यांच्या निवासस्थानामधून सीसीटीव्ही फुटेजही ताब्यात घेतले आहे.

या प्रकरणावरून भाजपने आप वर जोरदार निशाणा साधला आहे. तर आप ने स्वाती यांचे सर्व आरोप फेटाळले असून, स्वाती भाजपच्या षडयंत्राअंतर्गत आरोप करत असल्याचे म्हटले आहे. (पान ३ वर)

# पुण्यातील हिट अँड रन; मुलाच्या वडिलांना संभाजीनगरमध्ये अटक



पुणे : प्रतिनिधी- कल्याणीनगरमध्ये दोन दुचाकीस्वारांना अलिशान गाडीखाली चिरडणा-या अल्वपयीन मुलाचे वडिल बांधकाम व्यावसायिक अगरवाल यांना पुणे पोलिसांनी आज (बुधवारी) पहाटे संभाजीनगर मधून अटक केली आहे.

पुण्यातील कल्याणीनगरमध्ये १९ मे रोजी अल्पवयीन मुलाने केलेल्या अपघात प्रकरणात, अल्पवयीन मुलगा मद्यपान करतो हे माहिती असूनही, त्याला कार दिल्याने पुणे पोलिसांनी बांधकाम व्यावसायिक असलेल्या अल्पवयीन मुलाच्या वडिलांवर विविध कलमांतर्गत गुन्हे दाखल केला होता.

मात्र, गुन्हा दाखल होताच अल्पवयीन मुलाचे वडिल फरार झाले होते. त्यानंतर या बांधकाम व्यावसायिकाला अटक करण्यासाठी पोलिसांची पथके विविध ठिकाणी रवाना झाली होती. (पान ३ वर)

# शिक्षण विभागाने घेतला मोठा निर्णय

मुंबई – महाराष्ट्र बोर्डाचा बारावीचा निकाल जाहीर झाला. राज्यात यंदाही मुलींनी बाजी मारली आहे. दरम्यान कमी गुण मिळाल्याने काही विद्यार्थी नाराज झाले आहेत. पण त्यांची नाराजी आता दूर करण्यात आली आहे. महाराष्ट्र शालेय शिक्षण मंडळाने यासंदर्भात मोठा निर्णय घेतला आहे.


ज्या मुलांना कमी मार्क मिळाले आहेत, ती मुलं पुन्हा बसू शकतात, असा निर्णय शालेय शिक्षणमंत्री दीपक केसरकर यांनी घेतलाय.

बारावीच्या विद्यार्थ्यांचे मनापासून अभिनंदन करतो. ज्या विद्यार्थ्यांना बारावीत कमी गुण मिळाले आहेत, त्या कोणीही नाराज होऊ नये. त्यांच्यासाठी परीक्षा लवकर घेण्याची सूचना केल्या आहेत. संधीचा फायदा विद्यार्थ्यांनी घ्यावा, असे ते म्हणाले.

बारावीत शंभर टक्के गुण मिळवणाऱ्या तनिशाने सांगितलं यशाचं गुपितं

दहावीचा निकाल २७ जूनला लागू शकतो. २४ तारखेपासून प्रवेश सुरू होतील, असे ते म्हणाले. शालेय शिक्षण विभागाच्या निर्णयानुसार जी मुलं १२ वीत पास झाले परंतु ज्यांना (पान ३ वर)

# मी स्वबळावर राजकारणात येईन



नवी दिल्ली : लोकसभा निवडणुकीचे बिगुल वाजल्यानंतर काँग्रेसच्या सरचिटणीस प्रियंका गांधी यांचे पती रॉबर्ट वाड्रा यांनी आपण लोकसभा निवडणूक लढवण्यास इच्छुक असल्याचे विधान केले होते. मात्र त्यांना काँग्रेसकडून उमेदवारी देण्यात आली नव्हती. दरम्यान, सोमवारी पाचव्या टप्प्यात झालेल्या मतदानानंतर रॉबर्ट वाड्रा यांनी निवडणूक लढवण्याबाबत पुन्हा एकदा मोठे विधान केले आहे. यावेळी शक्य झालं नाही. मात्र पुढच्या वेळी अवश्य निवडणूक लढवणार असे विधान रॉबर्ट वाड्रा यांनी केले आहे.

रॉबर्ट वाड्रा याविषयी म्हणाले की, जर काँग्रेस पक्षाची इच्छा असेल तर मी पुढच्या वेळी निवडणूक अवश्य लढवेन. मी सक्रिय राजकारणात यावे अशी लोकांची इच्छा आहे. राजकारणात सहज प्रवेश करता यावा हा समाजसेवा करण्यामागचा हेतू नाही. माझ्यासाठी राजकारणात प्रवेश करणे सोपे आहे. मात्र मी गांधी कुटुंबीयांमधील असल्याने नाही तर माझ्या कामाच्या जोरावर राजकारणात प्रवेश करेन, असे रॉबर्ट वाड्रा यांनी सांगितले.

दरम्यान, लोकसभा निवडणुकीचे वारे वाहू लागल्यानंतर रॉबर्ट वाड्रा यांना अमेठी येथून उमेदवारी दिली जाईल अशी चर्चा सुरू झाली होती. याबाबत त्यांनी सांगितले होते की, मी अमेठीतल्या जनतेचे प्रतिनिधित्व करावे, त्यांच्या मतदारसंघात जावे, त्यांच्या समस्या ऐकाव्यात, त्यातून मार्ग काढावा, ज्यामुळे ते प्रगती करू शकतील, अशी अमेठीमधील लोकांची इच्छा आहे. मी सुद्धा राजकारणात येण्यासाठी इच्छुक आहे. मात्र याबाबतचा निर्णय हा (पान ३ वर)

# बालकांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण करण्यासाठी शाळापूर्व तयारी अभियानाच्या माध्यमातून प्रयत्न व्हावेत: -जिल्हाधिकारी




लातूर, / प्रतिनिधी- : इयत्ता पहिलीतील प्रवेश हा प्रत्येक बालकाच्या आयुष्यातील महत्वाचा टप्पा असतो. येथूनच खऱ्या अर्थाने औपचारिक शिक्षणाला सुरुवात होते. त्यामुळे या बालकांमध्ये शिक्षणाची आवड निर्माण होण्यासाठी शिक्षकांनी विशेष प्रयत्न करणे आवश्यक आहे. यासाठी शाळापूर्व तयारी अभियानाच्या माध्यमातून शिक्षकांची योग्य प्रकारे क्षमता बांधणी व्हावी, असे जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी सांगितले.

बालशिक्षण व मानवशास्त्र, एससीईआरटी, पुणे द्वारा आयोजित स्टार्स प्रकल्प अंतर्गत लातूर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या (डायट) वतीने लातूर येथील श्रीकिशन सोमाणी विद्यालय येथे आयोजित शाळापूर्व तयारी अभियान विभागस्तरीय मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे बोलत होत्या.

लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, धाराशिव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष, शिक्षण उपसंचालक डॉ. गणपत मोरे, लातूर डायटच्या प्राचार्य डॉ. भागीरथी गिरी, नांदेड डायटचे प्राचार्य डॉ. सुदर्शन चुटकुलवार, धाराशिव डायटचे प्राचार्य दयानंद जटमुरे, लातूर जिल्हा परिषदेचे महिला व बालकल्याण उपमुख्य कार्यकारी अधिकारी जावेद शेख, नांदेडच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी रेखा काळम, नगरपालिका प्रशासनचे जिल्हा सहआयुक्त रामदास कोकरे, लातूरच्या शिक्षणाधिकारी वंदना फुटाणे, नांदेडच्या शिक्षणाधिकारी डॉ. सविता बिरगे, शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यांच्यासह लातूर, धाराशिव, नांदेड येथील शिक्षक, पालक विद्यार्थी यावेळी उपस्थित होते.

इयत्ता पहिलीपासूनच शिक्षणाची गोडी निर्माण झाली, तर विद्यार्थ्याचे आयुष्य घडते. त्यामुळे पहिलीमध्ये प्रवेशित होणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचा पाया घडविण्याची आणि आयुष्याला दिशा देण्याची जबाबदारी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी पार पाडावी, असे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी केले. लातूर जिल्ह्यात शिक्षकांनी लोकसभा निवडणुकीत अतिशय चांगली कामगिरी केली, त्यामुळे मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडली. आता जिल्हा प्रशासनाने हाती घेतलेल्या वृक्ष लागवड मोहिमेतही शिक्षक, शाळांनी सक्रीय सहभाग नोंदवावा. शाळेत प्रवेश घेणाऱ्या ज्ञविद्यार्थ्यांचे पहिले पाऊल, वृक्ष लावूनफ हा उपक्रम राबवून प्रत्येक विद्यार्थ्यांच्या नावे शाळेमध्ये एक झाड (पान ३ वर)


भारतरत्न डॉ.ए.पी.जे.अब्दुल कलाम विश्व विद्यालय मुलांना केवळ बाराखडी शिकविणार नाही तर मुलांची मने सुसंस्कृत व गुणवत्तामय बनविणार आहे.

लक्ष्मणराव गुट्टे रुरल डेव्हलपमेंट फाऊंडेशन पुणे,द्वारा संचलित,



(स्वंय अर्थसहाय्य)

भारतरत्न डॉ.ए पी जे अब्दुल कलाम विश्व विद्यालय (लांजी पाटी)




जुन 2024-25 साठी प्रवेश देणे चालू आहे

J.K.G S.K.G | इयत्ता 1 ली ते 10 वी (मराठी/सेमी इंग्रजी) | इयत्ता 11 वी (कला,विज्ञान,वाणिज्य)

✻ विद्यालयाची वैशिष्ट्ये ✻

✻ निसर्गरम्य परिसर ✻ भव्य इमारत ✻ गुणवत्ता पुर्ण शिक्षण
✻ विद्यार्थ्यांकडे वैयक्तिक लक्ष ✻ शारिरिक शिक्षण ✻ व्यक्तिमत्व विकास
✻ राष्ट्रीय,आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध तज्ञांचे मार्गदर्शन.
✻ भव्य क्रीडांगण व सोयी-सुविधा उपलब्ध
✻ विविध स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन व ग्रंथालय उपलब्ध
✻ विद्यार्थ्यांसाठी स्कुल बस व्यवस्था आहे.

सर्व उपयुक्त सोयी-सुविधांसह निवासी वसतीगृह मुलांसाठी विद्यालयामध्येच उपलब्ध आहे.

संचालक : श्री शंकर सदाशिवराव गुट्टे
मो. 8830201851
9699814141

भारतरत्न डॉ.ए पी जे अब्दुल कलाम यांच्या स्वप्नातला विद्यार्थी आणि त्यांना अभिप्रेत असणारी देशभक्ती यासाठीचे खरे शिक्षण देण्याचा आमचा सांघिक प्रयत्न राहील.

पत्ता : गट नं. 149 अहमदपूर-किनगांव रोडवर,लांजी (पाटी) ता.अहमदपूर जि.लातूर-413515

www.lgrdfoundation.com तर चला मग एक वेळ आवश्य भेट देऊया...

अनाथ विद्यार्थ्यांसाठी मोफत शिक्षण

यशवंत धाराशिव जिल्हा
बुधवार दि. २२ मे २०२४
२
कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com

## डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचार मंचचावतीने दोन दिवशीय व्याख्यानमालेचे आयोजन

धाराशिव दि.२१(प्रतिनिधी) - डॉ.बाबासाहेब आंबेडकर विचार मंचच्यावतीने दि.२२ व २३ मे असे सलग दोन दिवशीय व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. दि.२२ मे रोजी पुरोगामी चळवळ आणि आजचा युवक या विषयावर सांगली येथील नितीन चंदनशिवे हे आपले विचार मांडणार आहेत.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धाराशिव जिल्हा परिषदेचे सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जरिचंद सावंत यांची उपस्थिती राहणार आहे. तसेच दि.२३ मे रोजी गौतम बुद्ध पौर्णिमे दिनानिमित्त उदगीर येथील शिवाजी महाविद्यालयातील प्रा. डॉ.विश्वंभर गायकवाड हे डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे बौद्धिक चरित्र : एक आकलन या विषयावर आपले विचार मांडणार आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड जिल्ह्यातील अर्जापूर येथील पानसरे महाविद्यालयाचे प्रा. डॉ. दिनकर झेंडे हे उपस्थित राहणार आहेत.

ही व्याख्यानमाला धाराशिव शहरातील शाहूनगर येथील छत्रपती संभाजी महाराज चौकातील सोनाई फंक्शन हॉल येथे पार पडणार आहे. त्यामुळे या व्याख्यानमालेस जिल्ह्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे, असे आवाहन डॉ बाबासाहेब आंबेडकर विचार मंचचे अध्यक्ष प्रा.रवी सुरवसे यांनी केले आहे.

# माधवराव पाटील यांची मुरुम येथे पुण्यतिथी साजरी

मुरुम (प्रतिनिधी) - स्व. माधवराव उर्फ काका पाटील यांनी उमरगा-लोहारा तालुक्याच्या विकासासाठी स्वतःला जोखून देऊन मोठ्या मेहनतीने उभी केलेली साखर कारखानदारी, शिक्षणसंस्था, या भागातील जमिनी ओलिताखाली आणण्यासाठी जाणीवपूर्वक राबविलेल्या जलसिंचनाच्या लहान-मोठ्या पाणी योजना, बेनीतुरा मध्यम प्रकल्पाची उभारणी त्यातून झालेला कृषी, सहकार व औद्योगिक विकास.

दरम्यान या परिसरात कुठलाही साखर कारखाना नसल्याने काकांनी येथील ऊस उत्पादक शेतकऱ्यांचे होणारे हाल व खाजगी साखर कारखानदार यांच्याकडून शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक थांबवण्यासाठी सहकारी तत्वावरील मुरूमच्या माळरानावर श्री विठ्ठलसाई सहकारी साखर कारखाना शेतकऱ्यांच्या मालकीचा झाला पाहिजे. म्हणून साखर उद्योग उभारण्याचे ठरवून विकासाची पहिली मुहूर्तमेढ सन १९९४ साली विठ्ठलसाईच्या निमित्ताने रोवली गेली. साखर कारखान्याच्या अगोदर काकांनी सन १९७० मध्ये नगर शिक्षण विकास मंडळ, मुरूम या शिक्षण संस्थेचा पाया रचला. पुढे त्यांचे जेष्ठ चिरंजीव माजी मंत्री बसवराज पाटील व त्यांचे बंधू जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील यांनी त्यावर कळस चढविला. तसेच युवा नेते ऊमरगा जनता सहकारी बँकेचे अध्यक्ष शरणजी पाटील हे वडीलांचा व काकांचा आदर्श घेऊन पुढे त्यांच्या विचारसरणीनुसार कार्यतत्पर राहून वाटचाल करीत आहेत. स्व. माधवराव (काका) पाटील यांची पुण्यतिथी मुरुम शहरात साजरी करण्यात आली. प्रारंभी स्व.माधवराव पाटील यांच्या समाधीस्थळी बसवराज पाटील, जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील यांनी पुष्पचक्र अर्पण करुन अभिवादन केले. श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या प्रांगणातील स्व. माधवराव पाटील यांच्या पुर्णाकृती पुतळ्यास बसवराज पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी जिल्हा बँकेचे अध्यक्ष बापूराव पाटील, आळंदचे माजी नगराध्यक्ष विठलराव पाटील, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य दिलीप भालेराव, पंचायत समितीचे माजी सभापती राजू पाटील, प्रशांत पाटील, माजी नगराध्यक्ष व्यंकटराव जाधव गुरुजी, ड.संजय बिराजदार, ड.व्ही.एस.आळंगे, प्रा.दिलीप गरुड, रशिद गुत्तेदार, सतिश पवार, माणिक राठोड, मल्लिनाथ दंडगे, धनराज मंगरुळे, दत्ता चटगे, स्वामी गुरुजी, प्राचार्य डॉ. अशोक सपाटे, सी.टी. बिराजदार, कारखान्याचे कार्यकारी संचालक एम. बी. अथनी आदींनी पुष्प अर्पण करून अभिवादन केले. शहरातील कै. माधवराव पाटील सार्वजनिक वाचनालय, प्रतिभा निकेतन विद्यालय, मुरुम, कोथळी, भुसणी व नूतन विद्यालय, मुरुम, तसेच विठलसाई सहकारी साखर कारखाना आदी ठिकाणी कै. माधवराव पाटील यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून पुण्यतिथी साजरी करण्यात आली.



## शेतकऱ्यांचे पीक कर्ज पुनर्गठनाचे आदेश बँकांना द्यावेत :दुधगावकर

धाराशिव दि.२१ (प्रतिनिधी) - खरीप हंगामातील काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या पेरणीसाठी शेतकजयांना पैसे उपलब्ध होण्यासाठी जिल्ह्यातील सर्व बँकांना शेतकजयांचे पीककर्ज पुनर्गठन करण्याबाबत आदेशित करावे, अशी मागणी केली आहे.

अन्यथा लोकशाही मार्गाने बँकेच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा संजय पाटील दुधगावकर यांनी एका निवेदनाद्वारे दि.२० मे रोजी दिला आहे. दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, २०२३-२४ या वर्षात कमी पावसामुळे पेरणी होऊनही उत्पादन कमी निघाले. जी पिके आली त्या पिकाला बाजारपेठेत योग्य भाव मिळाला नाही. त्यामुळे पडत्या भावात सोयाबीन हरभरा व अन्य पीक विकावी लागली. मागील महिन्यापासून सुरू असलेल्या अवकाळी पावसाचा फटका जिल्ह्यातील द्राक्ष, केळी, आंबा, फळबागा, ज्वारी, कडबा, पालेभाज्यांना काढणीमध्येच बसला आहे. निसर्गाच्या अवकृपेने शेतकरी हवालदिल झाला आहे. त्यातच शासनाने आठ तालुक्यांपैकी तीन तालुक्यात दुष्काळ जाहीर केला असून संपूर्ण जिल्हा दुष्काळाच्या खाईमध्ये लोटला आहे. चारा पाण्याचा वनवा आहे.

पशुधन व वन्य प्राणी तसेच शहर व खेडी पाण्याने तहानलेली आहेत. २०२३ चा पीक विमा शेतकऱ्यांना अद्याप मिळालेला नाही. त्याचप्रमाणे दुष्काळी अनुदान अद्याप न मिळाल्याने शेतकजयांना पेरणीसाठी मशागती करताना आर्थिक अडचणी निर्माण होत आहेत. खरीप हंगामातील काही दिवसांवर येऊन ठेपलेल्या पेरणीसाठी शेतकऱ्यांना पैसे उपलब्ध होण्यासाठी जिल्ह्यातील सर्व बँकांना शेतकऱ्यांचे पीक कर्ज पुनर्गठन करण्याबाबत आदेशित करावे. अन्यथा लोकशाही मार्गाने बँकेच्या विरोधात तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दुधगावकर यांनी दिला आहे.



## भोंजा हवेलीचे नेताजी भांदुर्गे ठरले चांदीच्या गदेचा मानकरी

परंडा दि.२१ (प्रतिनिधी) - तालुक्यातील कुक्कडगाव येथे अलिशाह कलंदर उर्स निमित्त दि. १८ मे रोजी कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले होते.

या निकाली कुस्तीच्या जंगी मैदानात पै नेताजी हंबीरराव भांदुर्गे यांनी रोख रक्कम २० हजार व ७ किलोची गदा मिळवल्याने भोंजा हवेलीमध्ये वाजत गाजत मिरवणूक काढण्यात आली. तर ग्रामस्थांनी हनुमान मंदीरात सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी भोंजाचे उपसरपंच वस्ताद शिवाजी घाडगे, माजी सरपंच नवनाथ मोरे, पै हंबीरराव भांदुर्गे, विलास नेटके, चेअरमन अर्जुन भांदुर्गे, मुख्याध्यापक बाळासाहेब घोगरे, माजी चेअरमन सुब्राव मोरे, डायरेक्टर गणेशदादा नेटके, पै अशोक सुतार, पै जालिंदर मोरे, उद्योजक गणेश घाडगे, उद्योजक शरद कोळी, बागायतदार पप्पू मोरे, सेवक मारूती भांदुर्गे, पै उमाजी भांदुर्गे, दिप्तेश कांबीलकर, बागायतदार अमोल मोरे आदींसह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## अनुदानावर बियाण्यांसाठी २४ मेपर्यंत मुदत

धाराशिव दि.२१ (प्रतिनिधी) - राज्य शासनाच्या महाडिबिटी पोर्टलवर शेतकरी योजना या शिर्षाखाली बियाणांचा लाभ घेण्यासाठी अर्ज करण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे. या सुविधे अंतर्गत लाभार्थ्याला येत्या खरीप हंगामात राष्ट्रीय खाद्य तेल अभियानातंर्गत पीक प्रात्यक्षिक बाबी अंतर्गत ०.४० आर साठी २२ किलो सोयाबीन प्रमाणित बियाणे ४० रुपये प्रती किलो अनुदानानर उपलब्ध आहे. तसेच प्रमाणित बियाणे वितरण बाबी अंतर्गत २० रुपये प्रती किलो प्रमाणे अनुदान देण्यात येणार आहे.

अन्न व पोषण सुरक्षा अभियान कडधान्य अंतर्गत तुर, मुग व उडीदच्या १० वर्षाच्या आतील वाणासाठी ५० रुपये किलो व तुर, मुग, उडीदच्या १९ वर्षावरील वाणासाठी २५ रुपये किलो बियाणे अनुदानावर उपलब्ध होणार आहे. तसेच तुर, मुग, उडीद पीक प्रात्याक्षिकासाठी ०.४० आर साठी १०० टक्के अनुदानावर बियाणे उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तर अन्न व पोषण सुरक्षा अभियान पौष्टिक तृणधान्य अंतर्गत बाजरी व खरीप ज्वारी पीक प्रात्यक्षिकासाठी ०.४० आर साठी १०० टक्के अनुदानावर बियाणे उपलब्ध करुन देण्यात येणार आहे.

प्रमाणित बियाणे वाटप बाबी अंतर्गत बाजरी पिकाच्या १० वर्षाच्या आतील वाण ३० रुपये किलो प्रमाणे अनुदानावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. तसेच अन्न व पोषण सुरक्षा अभियान भरड धान्य अंतर्गत मका पिक प्रात्यक्षिकाकरिता ०.४० आर साठी १०० टक्के अनुदानावर बियाणे उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यानी महाडिबिटी पोर्टलवर २४ मेपर्यंत अर्ज करणे बंधणकारक आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी महाडिबिटी पोर्टलवर अर्ज करुन योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी रविंद्र माने यांनी केले आहे.

## शिष्यवृत्तीचे प्रलंबीत अर्ज निकाली काढण्यास १५ जूनपर्यंत मुदतवाढ

### अर्ज रद्द झाल्यास प्राचार्य जबाबदार

धाराशिव दि.२१ (प्रतिनिधी) - इतर मागास बहुजन कल्याण विभागामार्फत व्हीजेएनटी, ओबीसी,एसबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना भारत सरकार मॅट्रीकोत्तर शिष्यवृत्ती, शिक्षण फी परीक्षा फी योजना,राजर्षी शाहू महाराज गुणवत्ता शिष्यवृत्ती, व्यवसाय प्रशिक्षण शुल्क प्रतिपुर्ती योजना व व्यावसायिक पाठ्यक्रमांशी संलग्न वस्तीगृहातील विद्यार्थ्यांना निर्वाह भत्ता या विविध योजनांचा लाभ ऑनलाईन महाडीबीटी प्रणालीद्वारे दिला जातो. शैक्षणिक वर्ष २०२३ - २४ साठी महाडीबीटी प्रणालीवर ऑनलाईन अर्ज मोठ्या प्रमाणात विद्यार्थीस्तर, महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असून हे प्रलंबित अर्ज निकाली काढण्यास १५ जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. जिल्ह्यातील सर्व प्राचार्यांनी महाडीबीटी ऑनलाईन प्रणालीवरील विद्यार्थी तथा महाविद्यालय लॉगिनवर प्रलंबित असलेल्या अर्जापैकी शासन निर्णय १ नोव्हेंबर २००३ व वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयान्वये पात्र ठरणारे अर्ज तात्काळ जिल्हास्तरावर पाठविण्यात यावे. तसेच ज्या विद्यार्थ्यांच्या अर्जामध्ये त्रुटी आहेत असे अर्ज विद्यार्थी लॉगिनला परत पाठवून विद्यार्थ्यांना त्याबाबत अवगत करावे व ह्या अर्जांची १० जूनपर्यंत त्रुटी पुर्तता करुन जिल्हास्तरावर मान्यतेसाठी पाठविण्यात यावे. प्रलंबित असलेले अर्ज निकाली काढण्याकरिता १५ जूनपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असून हे प्रलंबित अर्ज विहीत मुदतीत निकाली न काढल्यास असे अर्ज महाडीबीटी प्रणालीतून कायमस्वरुपी रद्द (uto Reject) होतील.

त्यामुळे विद्यार्थी लॉगिन तथा महाविद्यालय लॉगिनवर अर्ज प्रलंबित राहिल्याने एखादा विद्यार्थी शिष्यवृत्तीपासून वंचित राहिल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांची राहील.

त्यामुळे सन २०२३-२४ प्रलंबित महाविद्यालयीन स्तरावरील पात्र अर्ज संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्यांनी १० जूनपूर्वी जिल्हास्तरावर पाठवावेत. जेणेकरुन विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ देता येईल, असे आवाहन सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजण कल्याण बाबासाहेब अरवत यांनी केले आहे.

## झरेगाव येथे खरीप हंगामपूर्व तयारी व शेतकरी प्रशिक्षणास प्रतिसाद

धाराशिव (प्रतिनिधी) - तालुक्यातील झरेगाव येथे कृषी विभागाच्यावतीने खरीप हंगामपूर्व तयारी व शेतकरी प्रशिक्षण दि.१९ मे रोजी घेण्यात आले. या प्रशिक्षणास शेतकऱ्यांचा चांगला प्रतिसाद मिळाला.



कृषी विभागाच्यावतीने संपूर्ण जिल्ह्यातील गाव, वस्ती व तांड्यावर राहत असलेल्या शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान बी-बियाणांचा वापर करुन पेरणीमध्ये बीबीएफ पध्दतीचा अवलंब करून उत्पादन वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात येत आहेत. यामध्ये प्रामुख्याने मुख्य पीक सोयाबीन असल्याने सोयाबीन या पिकाच्या घरगुती बियाणे क्षमता तपासणी प्रात्यक्षिक व पेरणी वेळी सोयाबीन बीज प्रक्रिया प्रात्यक्षिक कृषी सहाय्यक नितीन जाधव यांनी करून दाखविले. तसेच मोसमी पाऊस पडल्यानंतर सोयाबीन पिकावर येणाऱ्या गोगलगाय या किडीच्या नियंत्रणासाठी आवश्यक मार्गदर्शन केले. तसेच कृषी विभागाच्यावतीने शेतकऱ्यांसाठी सर्व योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली. यावेळी रावसाहेब तांबे, शिवाजी ढोकळे, विकास सोनवणे, लक्ष्मण ढोकळे, आबासाहेब ढोकळे, संजय संकपाळ, अनिकेत ढोकळे, सुदेश साबळे, हनुमंत सोनवणे, उत्तरेश्वर एडके आदींसह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रोख १ लाख ३० हजार रुपयांसह ८८ ग्रॅम सोन्याचे दागिने, मोटारसायकल घेऊन चोरट्यांनी केला पोबारा

### जिल्हाभरात विविध ठिकाणी चोरट्यांनी मारला डल्ला

धाराशिव दि.२१ (प्रतिनिधी) - जिल्ह्यात धाडसी दरोडा तसेच घरी कोणी नसल्याची संधी पाहून घराचे कुलूप तोडून घरातील सोन्या-चांदीचे दागिने, रोख रक्कम व इतर साहित्यावर डल्ला मारण्याचा चोरट्यांचा धंदा दिवसेंदिवस वाढत चालल्याचे चित्र संपूर्ण जिल्हाभरात दिसून येत आहे. चोरट्यांची दहशत मोठ्या प्रमाणात निर्माण झाली असून नागरिक बेबी व घाबरलेली आहेत.

त्यामुळे सर्वसामान्य नागरिक या चोरीच्या प्रकारास वैतागले असून त्यांचा पोलिसांनी कायमस्वरूपी बंदोबस्त करावा अशी मागणी होऊ लागली आहे. दरम्यान, ८८ ग्रॅम सोन्याचे दागिने, रोख रक्कम व इतर विविध प्रकारच्या साहित्याची चोरी करुन चोरट्यांनी पोबारा केला आहे.

याबाबत तुळजापूर तालुक्यातील बारुळ येथील विनायक मारुती रोकडे (वय ७० वर्षे) हे रात्री जेवण करुन झोपले असता घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि. १६ मे रोजी १० वाजण्याच्या सुमारास ते दि. १७ मे रोजी ७ वाजण्याच्या सुमारास तोडून आत प्रवेश करुन घरातील प्लॅस्टीकच्या डब्यातील १५ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने, ३० हजार रुपये किंमतीचे व घराशेजारी राहणारे सुभाष जयप्रकाश पाटील यांचा व्हिडीओकॉन कंपनीचा एल.ई.डी. टी.व्ही. असा एकूण ५५ हजार रुपये किंमतीचा माल चोरुन नेला. या प्रकरणी विनायक रोकडे यांनी दि.१९ मे रोजी दिलेल्या तक्रारीवरून तुळजापूर पोलीस ठाण्यात ४५७, ३८० भा.दं.वि.सं. अन्वये गुन्हा नोंदवला आहे. तर नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथील शिवबा नगरमधील ह मु येडशी बसस्थानक जवळ येडशी येथील भाग्यश्री राजेश मामीलवाड (वय ३१ वर्षे) या उन्हाळी सुट्टयांमध्ये त्यांच्या गावी गेल्या असता त्यांच्या राहत्या घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि. १८ मे रोजी ११ ते दि. १९ मे रोजी सकाळी ७ वाजण्या पूर्वी तोडून आत प्रवेश करुन कपाटातील ४३ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने एकूण ८६ हजार रुपये किंमतीचे चोरुन नेले.

या प्रकरणी भाग्यश्री मामीलवाड यांनी दि.१९ मे रोजी दिलेल्या तक्रारीवरून धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात ४५७, ३८० भा.दं.वि.सं. अन्वये गुन्हा नोंदवला आहे. तसेचदि. २८ एप्रिल रोजी ४ ते दि. २९ मे रोजी ११ वाजण्याच्या सुमारास रुई शिवारातील सर्वे नंबर ५२ मधील वनविभागाच्या राखीव क्षेत्रातील जाळी तारेचे कंपाऊंडपैकी ९० मिटर जाळी तर अंदाजे १२ हजार रुपये किंमतीची अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली.

या प्रकरणी बीड जिल्ह्यातील चौसाळा येथील संकेत उध्दव टाके, (वय ३१ वर्षे) यांनी दि.१९ मे रोजी दिलेल्या तक्रारीवरून वाशी पोलीस ठाण्यात ३७९ भा.दं.वि.सं. अन्वये गुन्हा नोंदवला आहे. तर धाराशिव तालुक्यातील कौडगाव येथील धनाजी विठ्ठल तनवडे (वय ४५ वर्षे) हे दि.५ फेब्रुवारी रोजी ९ वाजण्याच्या सुमारास कौडगाव शिवारातील शेतात पाईपलाईन खोदण्याचे काम करीत असताना अज्ञात व्यक्तीने धनाजी तनवडे यांचा अंदाजे १८ हजार ९९९ रुपये किंमतीचा विवो वाय ५६ मॉडेलचा गोल्डन रंगाचा मोबाईल फोन चोरुन नेला. या प्रकरणी धनाजी तनवडे यांनी दि.१९ मे रोजी दिलेल्या तक्रारीवरून धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात ३७९ भा.दं.वि.सं. अन्वये गुन्हा नोंदवला आहे. तसेच उमरगा तालुक्यातील मुळजतांडा शिवाजी शंकरराव जाधव, वय ४४ वर्षे यांची अंदाजे २० हजार रुपये किंमतीची हिरो स्पेलंडर कंपनीची मोटारसायकल क्र एमएच २५ वाय ४२६३ ही दि.१७ मे रोजी ११ ते ३.३० वाजण्याच्या सुमारास आरोग्य नगरी भारत विद्यालय कॉम्पलेक्समधील गजानन पेंन्टच्या दुकानाजवळ उमरगा येथून अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली.

या प्रकरणी शिवाजी जाधव यांनी दि.१९ मे रोजी दिलेल्या तक्रारीवरून उमरगा पोलीस ठाण्यात ३७९ भा.दं.वि.सं.अन्वये गुन्हा नोंदवला आहे. तर धाराशिव शहरातील सांजा चौकातील यादव प्लॉटींग रतन ढोबळे यांच्या घरी पंकज काशीनाथ कोळी (वय ३९ वर्षे) यांच्या राहत्या घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि.१८ मे रोजी ९ ते दि. १९ मे रोजी २.४५ वाजण्याच्या सुमारास तोडून आत प्रवेश करुन लोखंडी कपाटातील ३० ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम १ लाख असा एकूण १ लाख ८५ हजार रुपये किंमतीचा माल चोरुन नेला. या प्रकरणी पंकज कोळी यांनी दि.१९ मे रोजी दिलेल्या तक्रारीवरून आनंदनगर पोलीस ठाण्यात ४५७, ३८० भा.दं.वि.सं. अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार ज्ञान स्पर्धेतील स्पर्धकांना बुध्दी पौर्णिमा दिनी पारितोषिकांचे वितरण

धाराशिव दि.२१ (प्रतिनिधी) - त्रिरत्न बुद्धिस्ट सेंटर धाराशिवच्यावतीने तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंती (बुद्ध पौर्णिमा) निमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकर विचार ज्ञान स्पर्धा २०२४ चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत यश मिळविलेल्या स्पर्धकांना पारितोषिकांचे वितरण बुद्ध पौर्णिमा दिनी दि.२३ मे रोजी करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून जिल्हा परिषद बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता जे.एस. सावंत व डोंबिवली येथील धम्मचारी अनोमदस्सी हे तर प्रमुख पाहुणे म्हणून मुंबई विद्यापीठाचे हिंदी विभाग प्रमुख डॉ दत्तात्रय मुरुमकर, डॉ वीरेंद्र गवळी आदी उपस्थित राहणार आहेत. जिल्हास्तरीय स्पर्धेत उमरगा येथील सानिया नबीलाल गुलफरेश (प्रथम) ७ हजार रुपये तर नंदिनी कमलाकर सुरवसे (द्वितीय) ५ हजार रुपये व तुळजापूर येथील अंजली मारुती कटकधोंड (तृतीय) ३ हजार रुपये तसेच प्रत्येक तालुक्यातील पहिल्या ३ विद्यार्थ्यांना अनुक्रमे १५०० रुपये, १००० रुपये व ५०० रुपये व ट्रॉफी अशी पारितोषिके देण्यात येणार आहेत.

यामध्ये वाशी तालुक्यातील कु. संचिता सचिन कवडे - ८ वी, विरेंद्र अरुण मस्के - ९ वी व कु दिपाली प्रभाकर कवडे - १० वी तर कळंब तालुक्यातील कु मयुरी सुधाकर आवाड - ७ वी, संघपाल सुधाकर आवाड ६ वी व श्रिया संजय साळुंके - १० वी तसेच लोहारा तालुका तालुक्यातील आर्यन विठ्ठल मस्के - ११ वी, हर्ष बळीराम सुरवसे - ९ वी व कु जान्हवी नरसाप्पा शिदोरे - ९ वी व धाराशिव तालुक्यातील श्रावणी अंकुश तौर - ८ वी, प्रणाली मोहन नागटिळक - ६ वी व आरुषी राजेश बचुटे - ९ वी तर उमरगा तालुक्यातील संचिता नागनाथ भोसले, दीप्ती गोविंद कांबळे व मंदाकिनी ज्ञानेश्वर केसरे तर तुळजापूर तालुक्यातील बोधने श्रुती श्रीशैल बोधने, प्राजक्ता परमेश्वर जाधव व सोनाली संजय राठोड -७ वी तसेच भूम तालुक्यातील प्रज्ञा दीपक नाईकनवरे, प्रथम दिलीप इजगज व सोनाली सिताराम गरड हे अनुक्रमे संबंधित तालुक्यातून प्रथम, द्वितीय व तृतीय आलेले आहेत.

विशेष म्हणजे जिल्हास्तरीय प्रथम, द्वितीय व तृतीय स्पर्धकांना पारितोषिकाच्या ५० टक्के रकमेचे ग्रंथ देऊन गौरविण्यात येणार आहे. त्रिरत्न बुद्धिस्ट सेंटर धाराशिवच्यावतीने तथागत भगवान गौतम बुद्ध यांच्या जयंती (बुद्ध पौर्णिमा) निमित्त डॉ बाबासाहेब आंबेडकर विचार ज्ञान स्पर्धा २०२४ चे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत यश मिळविलेल्या स्पर्धकांना पारितोषिकांचे वितरण बुद्ध पौर्णिमा दिनी दि.२३ मे रोजी करण्यात येणार आहे. हा कार्यक्रम धाराशिव शहरातील शाहू नगरमधील व्हिजन करीअर अॅक्डमी येथे आयोजित करण्यात आला असून या कार्यक्रमास जास्तीत जास्त नागरिकांनी उपस्थित रहावे असे आवाहन त्रिरत्न बुद्धिस्ट सेंटरच्यावतीने केले आहे.

# ईश्वराचे नामस्मरण केल्याने ऊर्जा मिळते :बनसोडे

उदगीर / प्रतिनिधी: आपण सर्वजण साधु संताच्या विचारावर चालणारे नागरीक आहोत संतानी दिलेल्या उपदेशाचे पालन आपण दैनंदिन जीवन करत असतो म्हणून तर आपण सर्वजन आप आपल्या पद्धतीने दान धर्म करतो तसे केल्याने पुण्य लाभते अशी शिकवण आपणास थोर संतांनी दिली आहे. माणूस म्हणून आपण सर्वजन एकच आहोत आपण सर्वजन धार्मिक कार्यक्रमाला महत्व देतो म्हणून आपल्याकडे संतांची प्रवचने होतात त्या संतांच्या प्रवचानातुन आपण ईश्र्वराच्या नामाचा जप करतो म्हणून ईश्र्वराचे नामस्मरण केल्याने आपणास आत्मशांती व ऊर्जा मिळते असे मत क्रीडा व युवक कल्याण, बंदरे मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.

ते श्री सदगुरु हावगीस्वामी शेतमळा, नांदेड बिदर रोड, उदगीर येथे आयोजीत श्री सदगुरु हावगीस्वामी मंदिर सुवर्ण कलशारोहण सोहळा व अखंड शिवनाम सप्ताह ५०५१ सदभक्तांचा भव्य ग्रंथराज परमरहस्य पारायण सोहळ्याप्रसंगी बोलत होते.

यावेळी जगद्गुरू डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामीजी वाराणसी, श्री गुरु हावगीस्वामी महाराज मठ संस्थांनचे मठाधिपती डॉ. शंभुलिंग शिवाचार्य महाराज, महादेव शिवाचार्य महाराज वाईकर, सिद्धलिंग महास्वामीजी देवणीकर, शिवानंद महास्वामीजी सायगाव, श्रीपती प्रभू पंडित आराध्य शिवाचार्य महाराज हाळीखेडकर, संगनबसवय्या महास्वामीजी निलंगा, शि.भ.प. उध्दव महाराज हैबतपुरे, शि.भ.प. तानाजी महाराज थोटवाडीकर, शि.भ.प. शिवराज नावंदे गुरुजी, राजेश्र्वर स्वामी, माजी नगराध्यक्ष राजेश्र्वर निटुरे, शिवसेनेचे नेते अ‍ॅड.गुलाबराव पटवारी, समीर शेख, मनोज पुदाले, वसंत पाटील, संभाजी पाटील, सुभाष धनुरे, बाबुराव बिरादार, विमल गर्जे, दत्ता पाटील, अनिता हैबतपुरे, आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी, श्री सदगुरु हावगीस्वामी मंदिर सुवर्ण कलशारोहण सोहळा व अखंड शिवनाम सप्ताह ५०५१ सदभक्तांचा भव्य ग्रंथराज परमरहस्य पारायण सोहळ्याच्या आयोजनाने उदगीर शहरात सर्वत्र चैतन्य व भक्तीमय वातावरण आहे. मागील काळात श्री गुरु हावगीस्वामी मठात परमरहस्य पारायण, भजन, किर्तन, प्रवचन, आर्शिवचन विविध संताच्या वाणीतून तर होतच असते मात्र काल शहरातुन भव्य - दिव्य पालखी सोहळा काढण्यात आला होता. यावेळी लाखो भविक भक्त उपस्थित होते. या भाविकांना दररोज अन्नदान केले जात आहे.

भविष्यात एक लाख भक्तांच्या उपस्थितीत हा सोहळा घेणार असुन आपल्या सर्वांचे ५०० वर्षापासुनचे स्वप्न पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पूर्ण केले असुन सर्व जाती धर्माला सोबत घेवुन आपण आपल्या देशाला पुढे घेवुन जाणार असुन विकसित भारत केल्याशिवाय आपण थांबायच नाही. येत्या काळात मतदार संघातील शेकडो महिलांना आयोध्यावारी आपण घडवुन आणणार असल्याचा मानस क्रीडा मंत्री संजय बनसोडे यांनी व्यक्त केला. यावेळी पंचक्रोशीतील हजारो भाविक - भक्त महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## सरस्वती विद्यालयाचे एच.एस. सी. परीक्षेत घवघवीत यश

लातूर / प्रतिनिधी- सरस्वती उच्च माध्यमिक विद्यालय खाडगांव प्रकाश नगर लातूर येथील मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या एच.एस.सी. बोर्ड परीक्षेचा निकाल ७०.००% इतका लागला आहे. विद्यालयातून सर्व प्रथम कु. पारखे प्रतिक्षा भास्कर ८२.३३%, द्वितीय कु. सुर्यवंशी राजश्री राजेशा ८१.१७%, तर तृतीय कु. आगवाने साक्षी वसंत ७१.८३%, गुण मिळाले असून विशेष प्राविण्यसह उत्तीर्ण ०२ विद्यार्थी, प्रथम श्रेणी उत्तीर्ण १० विद्यार्थी, द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण १५ विद्यार्थी उत्तीर्ण झालेले आहेत.

सरस्वती विद्यालयातील सर्व उतीर्ण विद्याध्यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष मा.श्री.बाळासाहेब श्रीहरी नाडे साहेब, उक्रयक्ष मा.श्री. बी. के. सूर्यवशी सर सचिव मा.श्री. अ‍ॅड. लक्ष्मणराव एकनाथराव भागवत सर, कोषाध्यक्ष मा.श्री. डॉ. राहूल लडूरीया, संचालक मा.श्री. संतोष सूर्यभान चपटे सर, मा.श्री.एस. जी. पाटिल साहेब, मा.श्री. डी.वी. माने सर, मा.श्री. एस. व्ही. पाटील सर शालेय समिती अध्यक्ष मा.श्री. चंद्रकांत काशीनाथराव साळुंके सर सरस्वती विद्यालयाचे मुख्याध्यापक मा.श्री. एच.एस. गवळी सर, पर्यवेक्षक श्री.पी. वी. मानेगर, परीक्षा प्रमुख मा.श्री वीडवे आर. ए. वर्गशिक्षक सुर्यवंशी जी.एम. तसेच शिक्षक श्रीमती देशमुख एस. व्ही. श्री श्रीमंगले एल. डी. व शिक्षकेत्तर कर्मचारी व परिसरातील नागरिक यानी गुणवंत विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

# संजीवनी महाविद्यालयाचे बारावी परीक्षेत घवघवीत यश

चापोली / प्रतिनिधी- महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी - मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या बारावीच्या परीक्षेत संजीवनी महाविद्यलय चापोलीचा ९४.२१ टक्के निकाल लागला आहे.

विज्ञान, कला व वाणिज्य शाखेतून ९३४ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली होती. त्यातील ८८० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. महाविद्यालयातून विशेष प्राविन्याने २४२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. तसेच प्रथम श्रेणीत ५४३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. विज्ञान शाखेचा ९७.६१ टक्के, कला शाखेचा ८६.५३ टक्के तर वाणिज्य शाखेचा ८९.८३ टक्के निकाल लागला आहे. विज्ञान शाखेत आयनुले तन्वी बाबासाहेब या विद्यार्थिनीने ८८.१७ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक पटकावला आहे. तसेच मुलगे अंजली पृथ्वीराज हिने ८८.०० टक्के मिळवत द्वितीय क्रमांक मिळवला आहे. तर अलमले संस्कृती रामेश्र्वर या विद्यार्थिनीने ८७.८३ टक्के मिळवत तृतीय क्रमांक मिळवला आहे. वाणिज्य शाखेतून कांबळे अजय दत्तात्रय या विद्यार्थ्यांने ६८.१७ टक्के गुण मिळवत प्रथम क्रमांक मिळवला आहे. तसेच नंदवे रुशिकेश तातेराव यांनी ६७.३३ टक्के गुण घेत द्वितीय तर माने श्रेया परमेश्र्वर हिने ६६.८३ टक्के गुण मिळवत तृतीय क्रमांक मिळवला आहे. कला शाखेतून मुजावर मेहरुन सादिक ह्या विद्यार्थिनीने ८३.१७ टक्के मिळवत कला शाखेतून प्रथम येण्याचा मान मिळवला आहे. त्या पाठोपाठ फुलारी अरुंधती महारुद्र हिने ८२.१७ टक्के तर भोसले मयुरी शिवाजी हिने ८२.०० टक्के मिळवत अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला आहे.

यंदाही निकालात मुलींनीच बाजी मारल्याचे पहावयास मिळत आहे. बारावीच्या परीक्षेत घवघवीत यश संपादन केलेल्या सर्व विद्यार्थ्यांचे महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. धनंजय नारायणराव चाटे, संस्था सचिव तथा चापोलीचे लोकनियुक्त सरपंच डॉ. भालचंद्र नारायणराव चाटे, विश्र्वनाथ शेटकर, डॉ. रामराव दुडीले, रामचंद्र तीरुके, काशिनाथ गंगापुरे, रंजनाताई कराड, मल्लिकार्जुन स्वामी, व्यंकटराव होनराव, बब्रुवान आवस्कर, भगवान सोमवंशी, कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. रमेश गुट्टे सह महाविद्यालयातील प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले.

पान १ वरून

### कोण आहे...

जंगलराजसाठी त्यांची आघाडी जबाबदार आहे. येथील काही लोकांनी भ्रष्टाचार केला आहे. त्यांना न्यायालयाने दोषी ठरवले आहे. देशातील जनतेने हे सर्व पाहिले आहे. या आघाडीत तीन गोष्टी सारख्या आहेत. त्या म्हणजे टोकाचा धर्मवाद, जातीवाद आणि कुटुंबवाद. मात्र, या सर्वांना ४ जून रोजी लोकसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यावर मोठा धक्का बसेल, अशा शब्दात पंतप्रधान मोदींनी इंडिया आघाडीवर हल्लाबोल केला.

ते पुढे म्हणाले, बिहारमधील आघाडीच्या नेत्यांना राज्यातील सन्मानाची पर्वा नाही. पंजाबमधील काँग्रेस नेते बिहारच्या लोकांबद्दल द्वेषपूर्ण बोलतात. पण बिहारमध्ये आरजेडी काँग्रेससोबत युती करत आहे. पहिल्यांदा त्यांनी येथून उद्योग आणि व्यवसायांचे स्थलांतर केले. आता ते बिहारच्या कष्टकरी सहकाऱ्यांचा अपमान करण्यात व्यस्त आहेत, असंही मोदी यावेळी म्हणाले.

### ट्रक-बस...

जाते की अपघातावर निबंध लिहा, असे करा, तसे करा.

त्या श्रीमंत मुलाला ज्या पद्धतीने शिक्षा म्हणून निबंध लिहायला लावला जातोय, तशा पद्धतीने त्या बस ड्रायव्हर, ट्रक ड्रायव्हरकडून का लिहून घेतले जात नाही. दोन भारत बनले आहेत, एक श्रीमंतांचा आणि एक गरिबांचा, असे पंतप्रधान नरेंद्र मोदींना विचारल्यानंतर ते म्हणतात की, मी सर्वांनाच गरीब बनवू का? पण प्रश्न हा नाही, प्रश्न आहे तो न्यायाचा. गरिबाला एक न्याय आणि श्रीमंतांना एक न्याय असे का? न्याय हा सर्वांनाच सारखा मिळाला पाहिजे. मग तो गरीब असो वा श्रीमंत.

### एसआयटी करणार...

दरम्यान, या प्रकरणाचा तपास आता एसआटी करणार असून, या एसआयटी टीमचे नेतृत्व उत्तर जिल्ह्यातील अतिरिक्त डीसीपी अंजिता चिपियाना करणार आहेत.

### पुण्यातील हिट...

दरम्यान, या प्रकरणातील आणखी एक धक्कादायक गोष्ट म्हणजे अल्पवयीने मुलाने ज्या कारने अपघात केला होता, ती कार विना नोंदनी असल्याचे समोर आले आहे.

दरम्यान, या प्रकरणात अल्पवयीन आरोपीला जामिन मिळाला आहे. आरोपीचा जामिन रद्द व्हावा यासाठी पुणे पोलीस सत्र न्यायालयात जाणार आहेत.

### शिक्षण...

कमी मार्क मिळाले आहेत. ती मूलही पुन्हा १२ वीच्या परीक्षेत बसू शकणार आहेत.

पुरवणी परीक्षेसाठी कधी करायचा अर्ज?

सर्व विषयांसह बारावीची परीक्षा उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना श्रेणीसुधार योजनेअंतर्गत जुलै-ऑगस्ट २०२४ आणि फेब्रुवारी-मार्च २०२५ या दरम्यान असणाऱ्या दोन संधीच हाताशी असतील. जुलै-ऑगस्टमध्ये विद्यार्थ्यांची पुरवणी परीक्षा घेतली जाणार आहे. ज्यासाठी २७ मेपासून शिक्षण मंडळाच्या संकेतस्थळावरून ऑनलाइन पद्धतीनं अर्ज भरता येणार आहेत याची नोंद घ्यावी.

### मी स्वबळावर...

योग्य वेळी घेतला जाईल, मात्र सध्या कुठलीही घाई नाही आहे असे रॉबर्ट वाड्रा म्हणाले होते.

लोकसभा निवडणुकीत राहुल गांधी यांच्या अमेठी येथून निवडणूक लढवण्याबाबत संभ्रमाचं वातावरण असताना रॉबर्ट वाड्रा यांनी गांधी कुटुंबाचा पारंपरिक मतदारसंघ असलेल्या अमेठी येथून निवडणूक लढवण्याची इच्छा व्यक्त केली होती. मात्र काँग्रेसने रॉबर्ट वाड्रा यांना उमेदवारी न देता अमेठी येथूम स्मृती इराणी यांच्याविरोधात के. एल. शर्मा यांना उमेदवारी जाहीर केली होती.

### बालकांमध्ये शिक्षणाची...

लावावे. तसेच विद्यार्थ्यांचा वाढदिवसादिवशी झाडाचाही वाढ दिवस साजरा करावा, असे जिल्हाधिकारी म्हणाल्या.

ग्रामीण भागातील इयत्ता पहिलीमध्ये प्रवेशित विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी शाळापूर्व तयारी अभियान उपयुक्त ठरेल. हे अभियान इयत्ता पहिलीमध्ये प्रवेशित होणाऱ्या बालकांसाठी असल्याने यामध्ये शिक्षण विभागासोबतच एकात्मिक बाल विकास प्रकल्प, आरोग्य विभाग यांनीही सहभाग देणे आवश्यक आहे, असे लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी सांगितले. तसेच लातूर जिल्ह्यात ८६० अंगणवाडीमध्ये ङ्गवन स्टॉप सेंटरफच्या माध्यमातून महिला व मुलांना समुपदेशन, लसीकरण यासह विविध सुविधा देण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच जिल्ह्यात ङ्गआकारफ आणि आरंभफ मोहीम प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रयत्न केले जात असल्याचे ते म्हणाले.

शाळापूर्व तयारी अभियान यशस्वी होण्यासाठी नियोजनपूर्वक प्रयत्नांची आणि शिक्षक, पालक यांची भूमिका महत्वाची आहे. एकही मुल शिक्षणापासून वंचित राहू नये, याची खबरदारी घेणे आवश्यक आहे. तसेच शिक्षकांना याबाबत योग्य प्रकारे प्रशिक्षित करणे आवश्यक असल्याचे धाराशिवचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. मैनाक घोष यांनी सांगितले.

शाळापूर्व तयारीसाठी हा विभागस्तरावरील पहिलाच मेळावा असून या अभियानामुळे कोणता विद्यार्थ्यी इयत्ता पहिलीमध्ये प्रवेशित होणार असल्याचे लक्षात येवून त्याचा प्रवेश जलदगतीने होण्यास मदत होते. पहिलीमध्ये प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्याला शैक्षणिक वर्ष संपेपर्यंत भाषिक आणि गणितीय कौशल्य शिकविण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले असून त्यादृष्टीने प्रयत्न केले जात असल्याचे शिक्षण उपसंचालक डॉ. गणपत मोरे यावेळी म्हणाले. प्रारंभी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर व डॉ. मैनाक घोष यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचे प्रातिनिधिक स्वरुपात स्वागत करण्यात आले. तसेच मेळाव्याच्या निमित्ताने उभारण्यात आलेल्या विविध दालनांची मान्यवरांनी पाहणी केली. जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्यावतीने तयार करण्यात आलेल्या ङ्गगाथा यशाची : समावेशनाकडून शिक्षणाकडे... या पुस्तकाचे यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक लातूर जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्थेच्या प्राचार्य डॉ. भागीरथी गिरी यांनी केले, सतीश भापकर यांनी उपस्थितांचे आभार मानले.

## DECLARATION

HERE IN THIS ADVERTISE I AM DECLARING THAT I HAVE CHANGE MY NAME WHICH WAS EARLIER - SITWAT IFTEKHAR SAYYAD TO: SITWAT IFTEKHAR SAYED HENCE FOR THIS DECLARATION I WILL BE KNOWN BY THIS NAME AND WILL USE SITWAT IFTEKHAR SAYED FUTURE THE SAME NAME WILL BE USED BY MY FAMILY AND RELATIVE

**OLD NAME**
SITWAT IFTEKHAR SAYYAD
**NEW NAME**
SITWAT IFTEKHAR SAYED
**ADDRESS**
AT POST ANKULGA (SAYED), TQ SHIRUR
ANANTPAL, DIST-LATUR.

## जाहीर प्रगटन

माझे पक्षकार काशिबाई विनायक जाधव रा. बाभळगाव रोड, म्हाडा कॉलनी, लातूर यांनी दिलेली माहिती, दर्शविलेले कागदपत्रे व अधिकृत केल्यावरुन लातूर जिल्हयातील तमाम जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे सुचित करण्यात येते की, माझे पक्षकार यांनी प्लॉटचे विद्यमान मालक अनुराधा प्रदीप कोकरे रा. मसोबावाडी ता. निलंगा जि. लातूर यांच्या खरेदी व मालकी कब्जे वहिवाटीचा प्लॉट याचा खरेदीखत दस्त डेबुक नं. ६१७३/२०२२, दि. ०१/०६/२०२२ ईसवी अन्वये मौ. महाराणा प्रताप नगर ता. जि. लातूर येथील जमीन सर्वे नं. ७५/अ पैकीचा याचा एन.ए.नं. १९८०/जेएमबी/सीआर-६९, दि. २९/०८/१९८२ ईसवी अन्वये मे. सबडिव्हीजनल ऑफीस, लातूर यांनी मंजुर केलेल्या पैकीचा प्लॉट नं. १२९ विक्री करत असून याचा ग्रामपंचायत मिळकत क्र. ९६५ याचे विक्री क्षेत्र रुंदी दक्षिण उत्तर १६ फुट व लांबी पूर्व पश्चिम ५५ फुट याचे विक्री एकूण क्षेत्रफळ ८८० चौ. फुट या प्लॉटची चतुः सिमा खालीलप्रमाणे :-पुर्वेस-शारदा कस्ट्रक्शन,पश्चिमेस-२० फुट रुंदीचा रस्ता,दक्षिणेस-उर्वरित जागा,उत्तरेस-मिरा मारुती हाके यांचा प्लॉट
येणेप्रमाणे चतु:सिमेच्या आतील प्लॉटचे विद्यमान मालक अनुराधा प्रदीप कोकरे रा. मसोबावाडी ता. निलंगा जि. लातूर यांनी सदर प्लॉट माझे पक्षकारास कायमस्वरुपी विक्रीचा ठराव करुन, ठरावापोटी कांही रक्कम इसार म्हणुन स्विकारली आहे. तरी सदर प्लॉटबाबत कोणाचा उजर, हक्कसंबंध, कर्जबोजा, गहाणखत, बक्षीसपत्र, कोर्ट डिक्री, मृत्युपत्र, तारण, लीज, लीन, शेजाऱ्याचा वाद, शासकीय अथवा निमशासकीय कर्ज असेल त्यांनी सदरचे प्रगटन प्रसिध्द झालेपासुन सात (७) दिवसाचे आत माझे खालील दिलेल्या कार्यालयीन पत्यावर योग्य त्या कागदपत्रांसह लेखी उजर दाखल करावा. मुदतीमध्ये जर कोणाचा आक्षेप नाही आल्यास सदर प्लॉट हा निर्वेध व निर्जोखीम आहे असे गृहित धरुन माझे पक्षकार सदर प्लॉटचे रजिस्टर्ड खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारे उजर/आक्षेप माझे पक्षकारांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्व जनतेने नोंद घ्यावी, सबब हे जाहीर प्रगटन.

दिनांक : २१/०५/२०२४
तर्फे
**अ‍ॅड. पी.व्ही. कलुरे**
**नोटरी गर्व्ह. ऑफ इंडिया**
**मोबा-९८८१०५४२७५**

**जाहिर प्रगटन देणार**
**काशिबाई विनायक जाधव**
**रा. बाभळगाव रोड, म्हाडा कॉलनी, लातूर**
**मो. नं. ९५११९४९६८३**

## जाहीरनामा

**रेणापुर येथील दिवाणी न्यायाधिश क. स्तर रेणापुर यांचे कोर्टात**

कोर्टाचा शिक्का

**दिवाणी अर्ज नंबर २२५/२०२३**
**राजाराम व इतर ५ वि. निरंक**
**निशाणी क.**
**वारसाचे सर्टिफिकेटबद्दल**

ज्यापेक्षा दुधाजी रामा राठोड, रा. जवळगा ता. रेणापूर जि. लातूर हे दि. १८/०६/२०२१ रोजी किंवा त्या सुमारास जवळगा ता. रेणापूर जि. लातूर येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार राजाराम दुधाजी राठोड, रा. नाईक नगर जवळगा ता. रेणापूर जि. लातूर हयांनी हया कोर्टास सदरहू मयताचे वारस खालील अर्जदार
१. राजाराम दुधाजी राठोड, वय ५० वर्षे, धंदा शेती, रा. नाईक नगर, जवळगा ता. रेणापूर जि. लातूर, २. सुमन बळीराज पवार, वय ५२ वर्षे, धंदा घरकाम, रा. हानमंतवाडी ता. रेणापूर जि. लातूर, ३. शालू नारायण जाधव, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम, रा. हाके तांडा ता. रेणापूर जि. लातूर, ४. संगीता बाळासाहेब पवार, वय ४२ वर्षे, धंदा घरकाम, रा. कन्हेरी तांडा ता. जि. लातूर मीराबाई तातेराव राठोड, वय ४२ वर्षे, धंदा घरकाम, ५. रा. नाईक नगर, जवळगा ता. रेणापूर जि. लातूर ६.राहुल तातेराव राठोड, वय २२ वर्षे, धंदा मजुरी रा. नाईक नगर, जवळगा ता. रेणापूर जि. लातूर ७.मालन दुधाजी राठोड, वय ७० वर्षे, धंदा मजुरी ७. रा. नाई नगर, जवळगा ता. रेणापूर जि. लातूर... अर्जदार
यांनी सर्टिफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेउन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू मयत दुधानी रामा राठोड, चे वारस सर्टिफिकेट देईल.

पुढील तारीखः २४/०६/२०२४
तारीखः ०८/०४/२०२४

**क. लिपिक**
**दि.न्या.क.स्तर, रेणापूर**

**सहायक अधिक्षक,**
**दिवाणी न्यायालय**
**क.स्तर, रेणापूर**

## जाहीरनामा

**रेणापूर येथील दिवाणी न्यायाधिश क. स्तर रेणापुर यांचे कोर्टात**

कोर्टाचा शिक्का

**दिवाणी किरकोळ अर्ज नंबर ९७/२०२४**
**व्यास व इतर ३ वि. निरंक**
**निशाणी क.**
**वारसाचे सर्टिफिकेटबद्दल**

ज्यापेक्षा जीवनराव दत्तात्रय पाटील, रेणापूर ता. रेणापूर जि. लातूर हे दि. ०६/०२/२०२२ रोजी लातूर ता. जि. लातूर येथे मयत झाले आहेत आणि अर्जदार व्यास जीवनराव पाटील, रा. रेणापूर ता. रेणापूर जि. लातूर हयांनी या कोर्टास सदरहू मयताचे वारस खालील अर्जदार १.व्यास जीवनराव पाटील, वय ३६ वर्षे, धंदा शेती,२. गजानन जीवनराव पाटील, वय ३४ वर्षे, धंदा शेती, ३. जयश्री जीवानराव पाटील, वय ६६ वर्षे, धंदा घरकाम, सर्व रा. रेणापूर ता. रेणापूर जि. लातूर,४. श्वेता शशिकांत क्षीरसागर, वय ३५ वर्षे, धंदा घरकाम, रा. देशपांडे कॉलनी लातूर ता. जि. लातूर.....अर्जदार
यांनी सर्टिफिकेट मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्या, आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरह अर्जदार हयाचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्याला सदरहू जीवनराव दत्तात्रय पाटील, वे वारस सर्टिफिकेट देईल.

पुढील तारीखः २४/०६/२०१४
तारीखः १०/०५/२४

**क. लिपिक**
**दि.न्या. क स्तर, रेणापूर**

**सहायक अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय**
**क. स्तर रेणापुर**

## जाहीरनामा

दिवाणी न्यायाधीश क. स्तर देवणी यांचे न्यायालयात
किरकोळ अर्ज क्र. ७६ / २०२४ निशाणी क्र.

अर्जदार अपर्णा भ्र. प्रमोद घोगरे ज्यापेक्षा पती नामे प्रमोद पि. दत्तात्रय घोगरे हे दिनांक १०/०१/२०२४ रोजी मौजे गुरधाळ ता. देवणी जि. लातूर येथे मयत झालेले आहेत.
त्यांचे वारसदार खालीप्रमाणे आहेत.

| अ.क्र | वारसाचे नाव | वय | मयताशी नाते |
|---|---|---|---|
| ०१ | अपर्णा भ्र. प्रमोद घोगरे | ३० | पत्नी |
| ०२ | प्रतिक पि. प्रमोद घोगरे | १२ | मुलगा |
| ०३ | पियुष पि. प्रमोद घोगरे | ०९ | मुलगा |
| ०४ | धोंडुबाई भ्र. दत्तात्रय घोगरे | ५२ | आई |

यांनी या कोर्टात सदरहू मयताच Heirship certificate/वारसा प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज केला आहे. त्यापेक्षा सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हे असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक (०१) महिण्याच्या आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती लेखी स्वरुपात कळवाव्यात. आणि या लेखावरून असे कळविण्यांत येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबित दिसल्यास त्याला सदरहू मयाताचे Heirship certificate/वारस प्रमाणपत्र देईल. सदरचे जाहीरप्रगटन हे आज दिनांक १५/०५/२०२४ रोजी माझे सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले आहे. पुढील नेमलेली तारीख :- २०/०६/२०२४.

(आर.टी.शिंदे)
व.लिपीक

(आर.एस.वाघमारे)
प्र.सहायक अधिक्षक








उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर
उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२१५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

मराठवाड्यात एक अद्यावत नेत्र रुग्णालय
भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड) डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार ४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ
डॉ.अंकिता लाहोटी (DOMS)
डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.)
डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष
व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर
लॉ. प्रदिप बेद्रे सचिव





हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय-गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी-२४६९४६, मुख्य कार्यालय -५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी-२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी-(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय - दूरध्वनी - २२१४५३, उदगीर कार्यालय-(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक-**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे,** संपादक - **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे ईमेल** : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# यशवंत उदगीर

बुधवार दिनांक २२ मे २०२४

पान ४

कार्यालय :०२३८५-२५३१९८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com


# श्री गुरु हावगीस्वामी मंदिर कळसारोहण व दिपोत्सव उत्साहात संपन्न



उदगीर (प्रतिनिधी) श्रीगुरु हावगीस्वामी मंदिर सुवर्ण कळसारोहण व दिपोत्सव सोहळा काशी पीठाचे जगद्गुरु डॉ. चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामी यांच्या उपस्थितीत उत्साहात संपन्न झाला.

उदगीरचे आराध्य देवत श्री गुरु हावगीस्वामी महाराज मंदिरवर सुवर्ण कळसारोहण सोहळा निमित्य श्री गुरु हावगीस्वामी शेतमळा बिदर रेल्वे गेट बिदर रोड उदगीर येथे १३ मे ते २० मे दरम्यान शिवनाम सप्ताह,परमरहस्य ग्रंथाचे पारायण ,प्रवचन, किर्तन गाथा भजन व शिवपाठ रिंगण सोहळा संपन्न झाला .शनिवार दि.१९ मे रोजी परमरहस्य ग्रंथ पारायणाची सांगता होऊन भव्य रथात काशीपीठाचे जगदगुरु डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महास्वामी, यांची सुवर्ण कलश ,परमरहस्य ग्रंथ ची भव्य मिरवणूक काढण्यात आली या रथात डॉ.शंभूलिंग शिवाचार्य महाराज,सिध्दलिंग महास्वामी देवणी,शंभुलिंग शिवाचार्य आंबेजोगाई, देशिकेंद्र महाराज आदी शिवाचार्य ची कलशधारी सुवासीनी महिला, विविध गावचे महिला भजनी मंडळ टाळमृदगाच्या गजरात गुरुराज माऊलीचा गजर करत पाऊले खेळत सहभागी झाले होते.ही मिरवणूक छत्रपती शिवाजी महाराज चौक, पोलिस स्टेशन, पत्तेवार चौक, पुदाले चौक, वीरशैव समाज,आर्य समाज, चौबारा मार्गे श्री गुरु हावगी स्वामी मंदिर येथे सुवर्णकळस मिरवणूकिचा समारोप झाला. सोमवार दि.२१मे रोजी सकाळी ठिक दहा वाजता काशीपीठाचे जगदगुरु डॉ.चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांचे हस्ते विधिवत सुवर्णकळस पुजन करुन शिवनामाचा गजर करत हजारो भक्तांच्या उपस्थितित मंदिरावर सुवर्ण कळस चढवण्यात आला.



सायंकाळी ठिक सात वाजता श्री गुरु हावगीस्वामी मंदिर वर व प्रारंणात महिलांनी दिप लावले, दिपोत्सव व सप्तरंगीत फ्फटाक्याची आतषबाजी करुन दिपोत्सव उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी शंभूलिंग शिवाचार्य महाराज, महादेव शिवाचार्य महाराज वाईकर, शंभुलिंग शिवाचार्य महाराज अंबाजोगाई,सिध्दलिंग महास्वामी देवणी,म.नि.प्र.शिवानंद महा स्वामी सायगावकर , सिध्दओमकार शिवाचार्य जंगमवाडी,मुरुगेंद्र स्वामी आदी उपस्थित होते.

सुवर्ण कळसारोहण मिरवणुकीत विरभद्रस्वामी यांच्या नेतृत्वाखाली वैदिक पौरहित्य मंडळ,हावगी स्वामी युवक मंडळ व श्रीगुरु हावगीस्वामी महिला, औंकारेश्वर भजनी मंडळ, शिवशक्ती भजनी मंडळ, नवशा महादेव भजनी मंडळ,सिध्दरामेश्वर भजनी मंडळ, शिवलिंग पाटिल, सोमेश्वर भजनी मंडळ, बसवनकेरी भजनी मंडळ, समता नगर भजनी मंडळ, मन्मथेश्वर भजनी मंडळ, विरेश्वर भजनी मंडळ, कपाळे गल्ली भजनी मंडळ, सुखशांती महिला भजनी मंडळ, सोन्यामारोती भजनी मंडळ, मन्मथशिवलींग भजनी मंडळ तर विरभद्र स्वामी यांच्या नेतृत्वाखाली वैदिक पौरहित्य मंडळांनी सहभाग घेतला होता.

००००

# पंडित जवाहरलाल नेहरू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय,तोगरी निकाल९८.८२ टक्के

उदगीर/प्रतिनिधी : पंडित जवाहरलाल नेहरू माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय तोगरी चा फेब्रुवारी २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा इयत्ता बारावी बोर्ड परीक्षेचा निकाल ९८. ८२ टक्के निकाल लागला असून, या विद्यालयाने उज्वल यशाची परंपरा चालू ठेवला असून १२वी परीक्षेसाठी विज्ञान शाखेतून १६० विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून ९९.३७% निकाल लागला आहे ,विज्ञान शाखेतून विशेष प्राविण्यासह ६३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून प्रथम श्रेणीत ९१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत तर द्वितीय श्रेणीत ५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत ,विज्ञान शाखेतून पोकलवार रोहित राजेंद्र ८८.३३% गुण घेऊन प्रथम आला तर कु. स्वामी संस्कृती परमेश्वर ८७.३३ टक्के गुण घेऊन द्वितीय तर कु.पाटील तनुजा शिवराज ८६.१७ टक्के गुण घेऊन तृतीय आली आहे. कला शाखेतून ९५ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून ९७.८९% निकाल लागला आहे .विशेष प्राविण्यासह दहा विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत तर प्रथम श्रेणीत ६२ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत २१ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत .कला शाखेतून कु. शेख नाहेद मुदलीफ्फ ८१.३३ टक्के गुण घेऊन प्रथम तर शेख तब्बू जहांगीर ८०.३३% गुण घेऊन द्वितीय तर कु.शेख गुलनाज जिलानी ७९.८३% गुण घेऊन त्रतीय आली आहे. उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे संस्थेच्या अध्यक्षा सौ शांतामा पंडितराव पाटील ,सचिव इंदुमती मनोहरराव येरनाळे, कार्याध्यक्ष श्री महेश मनोहरराव येरनाळे, प्राचार्या वंदना महेश येरनाळे,उपप्राचार्य काळगापुरे गुणवंत आणाराव, पर्यवेक्षक श्री लोभाजी लक्ष्मण दौलतराव, केंद्र संचालक श्री सय्यद रऊफ्फ रशीदसाब शाळेतील सर्व शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचाऱ्याकडून उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले.

# संभाजीराव केंद्रे कनिष्ठ महाविद्यालयाच्यां विद्यार्थ्याचे यश

जळकोट : प्रतिनिधी

येथील इयत्ता १२ वी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक विभागीय शिक्षण मंडळ लातूरच्या वतीने घेण्यात आलेल्या परिक्षेत संभाजीराव केंद्रे कनिष्ठ महाविद्यालय जळकोट येथील विज्ञान व कला शाखेच्या विद्यार्थ्यांनी आपल्या महाविद्यालयाच्या यशाची परंपरा कायम ठेवून घवघवीत यश संपादन केले आहे .

संभाजीराव केंद्रे कनिष्ठ महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेचा निकाल १०० % लागला , तर कला शाखेचा निकाल ७६ % लागला आहे . विज्ञान शाखेत कनिष्ठ महाविद्यालयातुन प्रथम येण्याचा बहुमान कु वैष्णवी अशोक गुट्टे ९०.६७ %, द्वितीय कु श्रद्धा व्यंकटराव पाटील ८९.५०, तर तृतीय सय्यद जैद गफ्फार ८८.८३% . कनिष्ठ महाविद्यालयातून विज्ञान शाखेतुन विशेष प्राविण्य सह २९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण विद्यार्थी २२, द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण विद्यार्थी ०७ अशा प्रकारे विज्ञान शाखेचा एकूण निकाल १०० % लागला . तसेच कला शाखेतून प्रथम येण्याचा बहुमान संगमेश्वर सुभाष गुट्टे ७२ .५० %, द्वितीय प्रमोद रामचंद्र जाधव ६९ .१७ %, तृतीय प्राजक्ता रामचंद्र जाधव ६९ % . कला शाखेतून प्रथम श्रेणीत एकूण उत्तीर्ण विद्यार्थी ९, द्वितीय श्रेणीत ९ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

ग्रामिण भागातील विद्यार्थ्यांनी आपल्या मेहनतीच्या बळावर व शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे घवघवीत यश संपादन केल्याबद्दल जिजामाता बहुउद्देशिय शिक्षण प्रसारक मंडळ पाटोदा (बु ) संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मनवेंद्र संभाजीराव केंद्रे, अध्यक्ष डॉ. भागवत केंद्रे, प्राचार्य डॉ. बाबुराव लहाने, अनिल केंद्रे यानी अभिनंदन केले आहे . या गुणवंताना मार्गदर्शन उपप्राचार्य डॉ व्यकंट पाटील प्रा. सूर्यकांत गुट्टे ,प्रा. राहूल लटपटे, प्रा मुंडे गोविंद, प्रा . शिवाजी गोताळे, प्रा. बाबाराव श्रीमंगले , प्रा. कांबळे धनराज, अनिल केंद्रे, ग्रंथपाल डॉ. नामदेव राठोड, प्रा . डॉ . विजय कलूरकर आदिचे मार्गदर्शन मिळाले. बळीराम केंद्रें, प्रविण कांबळे, सोनहिवरे ज्ञानेश्वर,श्रीमती अहिल्या गायकवाड, रवी दाडगे व सर्वस्तरातून गुणवंत विद्यार्थ्यावर व कनिष्ठ महाविद्यालयाचा १०० % निकाल लागल्याबददल अभिनंदनाचा वर्षाव होत आहे .

# गंगाधरराव साकोळकर पाटील उच्च माध्यमिक विद्यालयाचा निकाल १००%

देवर्जन : स्वातंत्र्य सैनिक शिक्षण संस्था देवर्जन द्वारा संचलित गंगाधरराव साकोळकर पाटील माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाची उज्ज्वल निकालाची परंपरा कायम राखली असून कला व विज्ञान शाखेचा निकाल शंभर टक्के लागला आहे. ग्रामीण भागातील मुलांना दर्जेदार शिक्षणाची संधी उपलब्ध व्हावी या उदात्त हेतूने १९८९मध्ये स्थापन झालेल्या या शाळेने अगदी दहावी व बारावीच्या पहिल्या बॅचपासून दैदिप्यमान कामगिरी केली असून आज तागायत १००% निकालाची परंपरा गेल्या अनेक वर्षापासून कायम राखली आहे. फ्फेब्रुवारी २०२४ च्या बारावी बोर्ड परीक्षेत कला व विज्ञान शाखेचा निकाल शंभर टक्के लागला असून कला शाखेस विद्यालयाचे ३०विद्यार्थी तर विज्ञान शाखेस ७८ विद्यार्थी परीक्षेस प्रविष्ट झालेले होते. यात विशेष प्राविण्याने २९ प्रथम श्रेणी५९ तर द्वितीय श्रेणीत २० विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.कला शाखेतून वाघमारे शिल्पा शिवाजी ८१ह्र३३% गुण घेवून प्रथम व शिंदे प्रबुद्ध विद्यासागर ७०ह्र६७% गुण घेवून द्वितीय तर गोलकोंडे प्रांजली हणमंत ७०% गुण घेवून तृतीय येण्याचा मान मिळवला आहे. तर विज्ञान शाखेतून माकणे ऋतुजा सुधाकर ८७.१७% गुण घेवून प्रथम ,भाडसंगे दिव्या कमलाकर व गरिबे अनुराधा गंगाधर प्रत्येकी ८४.३३% गुण घेवून-द्वितीय तर पाटील पृथ्वीराज बाळासाहेब ८३ह्र६७% गुण घेवून तृतीय येण्याचा बहुमान मिळवला आहे. या यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन,स्वातंत्र्य सैनिक शिक्षण संस्था देवर्जनचे अध्यक्ष शिवाजीराव साकोळकर पाटील,सचिव प्रा.ओमप्रकाश साकोळकर पाटील, उपाध्यक्ष मनोज साकोळकर पाटील, संचालक रोडगे सर,प्राचार्य भालके एस बी,पर्यवेक्षक कांबळे एम ए, उच्च माध्यमिक विभागाचे पर्यवेक्षक, कांबळे डि पी, सांस्कृतीक विभागप्रमुख हाम्पल्ले एस डी व सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले आहे.

# श्यामलाल स्मारक कनिष्ठ महाविद्यालयाचा १००% निकाल

उदगीर : एचएससी बोर्ड परीक्षा २०२४ मध्ये झालेल्या परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून यात श्यामलाल स्मारक कनिष्ठ महाविद्यालय, उदगीर येथील विज्ञान शाखेचा १००% तर कला शाखेचा ७७% निकाल लागला आहे. विज्ञान शाखेतील गुणवंत विद्यार्थी बिरादार हर्षदा माधव ७६.५०% गुण घेऊन प्रथम, गोखले सांची चंद्रगुप्त ७६.१७% गुण घेऊन द्वितीय, रुद्रवार अमर संतोष ७५.८३% गुण घेऊन तृतीय येत यश संपादन केले आहे. विशेष प्राविण्यासह ०३ विद्यार्थी, प्रथम श्रेणीमध्ये ११ विद्यार्थी, द्वितीय श्रेणीमधे ५७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आ-हेत. तर कला शाखेमध्ये कसबे गायत्री तुकाराम - ६९.६७% गुण घेऊन प्रथम, मदने आशिका प्रमोद - ६७.१७% गुण घेऊन द्वितीय, कसबे रोशनी सोपान - ६३.१७% गुण घेऊन तृतीय येत यश संपादन केले आहे. प्रथम श्रेणीमध्ये ०६ विद्यार्थी, द्वितीय श्रेणीमधे २५ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. संस्थेचे अध्यक्ष ॲड. सुपोषपाणि आर्य, सचिव ॲड. विक्रम संकाये, सहसचिव अंजुमाणि आर्य, प्राचार्य बालाजी चव्हाण, पर्यवेक्षक प्रा. लिमये आर.जे. आदिंनी सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचे अभिनंदन व कौतुक केले. सर्व विद्यार्थ्यांना प्रा.सपाटे डी.एल., प्रा. खंदारे बी.एम., प्रा. घोगरे एस.व्ही., प्रा. मोघेकर एम.आर., प्रा. सगर एस.एन., प्रा. पाटील पी.बी., प्रा. सोनकांबळे एस.आय.,प्रा. पाटील एस.जे., प्रा. कराड बी.एन. या प्राध्यापकांचे मार्गदर्शन लाभले.

# जमहूर उच्च माध्यमिक विद्यालय H.S.C बोर्ड परीक्षा निकालात उत्तुंग यशाची परंपरा कायम

उदगीर/प्रतिनिधी :

महाराष्ट्र राज्य शिक्षण मंडळ पुणे मार्फत आयोजित एच एस सी बोर्ड परीक्षेचा निकाल घोषित करण्यात आला.

जमहूर उच्च माध्यमिक विद्यालयाने प्रति वर्षाप्रमाणे याही वर्षी बोर्ड परीक्षेच्या निकालात घवघवीत यश संपादित केले आहे. विद्यालयाचा निकाल ९८% टक्के असून विज्ञान शाखेचा निकाल ९६% लागलेला आहे. कला शाखेतून ०३ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्यासह यश मिळवले आहे. परीक्षेत १०३ विद्यार्थी सहभागी होते यातील २४ पेक्षा अधिक विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण आहेत. १. शेख अलबिरा मुनीर ८६% गुण घेवून विद्यालयात सर्वप्रथम आहे द्वितीय क्रमांकावर २.पठाण नेहा अफ्फजल खान ७९% व ३.शेख परविन शफ्फ योदिन ७७% गुण घेऊन यश संपादित केले.

यशस्वी व गुणवंत विद्यार्थ्यांच आज शाळेत संस्थेच्या सचिव डॉक्टर अंजुम कादरी मॅडम तसेच विद्यालयाचे प्राचार्य राजा पटेल अब्दुल बाकी यांनी विद्यार्थ्यांना पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देऊन विद्यार्थ्यांच्या यशाचा गौरव व अभिनंदन केला याप्रसंगी संस्था सचिवांनी विद्यार्थ्यांनी शिक्षण घेऊन स्पर्धा परीक्षा सोबत उच्चशिक्षण घेऊन राष्ट्र व समाजाची सेवा करावी व आपल्या मातापित्यांचे नाव उज्जवल करावे असे आपले मनोगत व्यक्त केले व विद्यार्थी व तसेच प्राध्यापक वृंद यांना हार्दिक शुभेच्छा देत अभिनंदन केले.

या प्रसंगी कार्यक्रमात पर्यवेक्षक गोलंदाज वाजिद, ज्युनिअर कॉलेजचे प्रभारी प्रा.जागीरदार महेमुद अली, प्रा.अतिया खानम तसेच प्रा.यास्मिन मॅडम, प्रा गजाला मॅडम, प्रा.नाझरीन मॅडम व शेख इसाक सर अमान दायमी सर, शेख आयाज सर शिक्षक कर्मचारी उपस्थित होते.

००००

# अल-अमीनने यशाची परंपरा राखली, १००% निकाल

उदगीर: महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फ्फे मार्च २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत अल-अमीन उच्च माध्यमिक विद्यालयाने यशाची परंपरा राखत विद्यालयाचा निकाल शंभर टक्के दिला आहे. विशेष म्हणजे यावर्षी उदगीर शहरातून शंभर टक्के निकाल देण्याचा मान अल-अमीन उच्च माध्यमिक विद्यालयाला मिळाला आहे. लातूर जिल्ह्यात उर्दू माध्यमांच्या शाळेत एक अग्रेसर नाव अल-अमीन विद्यालयाचे आहे. विद्यालयातर्फ्फे कला व विज्ञान दोन्ही शाखा चालविल्या जातात. विज्ञान शाखेतून एकूण ५२ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिल्या. सर्वच्या सर्व विद्यार्थी यशस्वी झाले. शेख उम्मे बरीरा अब्दुल जब्बार ही विद्यार्थिनी ८०.५० गुण मिळवून विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाली आहे. विद्यालयातून प्रथम येण्याचा मानही याच विद्यार्थिनींने मिळविला आहे. शेख महेक असग़र या विद्यार्थिनीने ७४.८३ गुण मिळवून विद्यालयातून दुसरी आली आहे. ११ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, ३१ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत व ०९ विद्यार्थी यशस्वी श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत.

कला शाखेतून ३६ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली.०५ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, २२ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर ०९ विद्यार्थी यशस्वी श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. विद्यार्थ्यांच्या व विद्यालयाच्या या यशात विद्यार्थ्यांच्या कष्टाबरोबरच प्राचार्य सय्यदा आज़ेमा बेगम पर्यवेक्षक गुलाम ग़ौस खान शिक्षकव शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचाही महत्त्वाचा वाटा आहे.

विद्यार्थ्यांच्या व विद्यालयाच्या या यशाबद्दल अल-अमीन शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष माननीय डॉक्टर इसाखान साहेब, सचिव माननीय शेख अकबर साहेब व इतर पदाधिकाऱ्यांनी विद्यालयाच्या प्राचार्या सयदा आज़ेमा बेगम, पर्यवेक्षक गुलाम ग़ौस खान, शिक्षक- शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनायशस्वीभवितव्यासाठी शुभकामना दिल्या.

# देवणी पंचायत समिती कार्यालयात दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस साजरा



देवणी : भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची २१ मे १९९१ रोजी मद्रास जवळील श्री पेरबुदूर या गावी दहशतवाद्याकडून हत्या करण्यात आली भारताचे सहावे पंतप्रधान राजीव गांधी यांच्या पुण्यतिथी निमित्य राष्ट्रीय दहशतवादी विरोधी दिन साजरा करण्यात येतो त्यांचा एक भाग म्हणून देवणी पंचायत समितीतील सर्व कर्मचारी यांना देवणी पंचायत समितीचे गटविकास अधिकारी यांनी दहशतवाद हिंसाचार विरोधी विरोधी शपथ दिली यावेळी माचेवाड विश्वनाथ, गंडाळे जी. एफ्फ,गाडे ए एन, अल्लापुरे,सचिन बावगे सहाय्यक अभियंता आमगे शरद पाटील.दिलीप कांबळे,सौ अल्का मिरकले श्रीमती संगीता सूर्यवंशी, सह अनेक कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते

# संत तुकाराम लॉ कॉलेज मध्ये नवीन फौजदारी कायदे प्रशिक्षण शिबिर

प्रतिनिधी:

बाळ भगवान शिक्षण प्रसारक मंडळ अहमदपूर द्वारा संचालित संत तुकाराम लॉ कॉलेज उदगीर तथा उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय उदगीर यांच्या संयुक्त विद्यमाने ट्रेनिंग ऑफ ट्रेनर टीचिंग कोर्स अंतर्गत नवीन फ्फौजदारी कायदे प्रशिक्षण शिबिराचे उदघाटन उपविभागीय पोलीस अधिकारी श्री सोहेल शेख साहेब यांच्या हस्ते झाले.




याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉक्टर राजकुमार प्रेमसुख नावंदर, तर प्रमुख उपस्थिती म्हणून शहर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक करण सोनकवडे, ग्रामीण पोलीस स्टेशनचे सह- पोलीस निरीक्षक बहातरे , सुप्रीम कोर्टाचे वरिष्ठ विधीज्ञ व उदगीरचे भूमिपुत्र शंकर चिल्लरगे, मुंबई उच्च न्यायालयाचे विशेष सरकारी वकील ॲड .युवराज पाटील, मुंबई महानगरपालिकाचे उपायुक्त डॉ. विजयकुमार द्वासे, उदगीर विधींज्ञ संघाचे अध्यक्ष ॲड बालाजी वलांडीकर, धन्वंतरी आयुर्वेदिक कॉलेजचे प्राचार्य डॉ. दत्तात्रय पाटील, उदगीरचे जिल्हा सरकारी वकील ॲड.एस.आय. बिरादार, ज्येष्ठ विधिज्ञब ॲड.एस.टी. पाटील, ॲड.महेश मळगे, ॲड. सुरेश मुदुडगे, ॲड.जमीरोद्दीन जागीरदार,नवाजमुंजेवार, अविनाश शेटकर कार्यालयीन अधीक्षक अजय कांबळे,महेश बायस, निळकंठ कानवटे, लक्ष्मीकांत डोईजोडे,अशोक द्वासे तसेच महाविद्यालयाचे प्राध्यापक, कर्मचारी, पोलीस अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. जयवर्धन भाले तर आभार प्रदर्शन ॲड.दिप्ती राजकुमार नावंदर यांनी केले आहे.

सदरील प्रशिक्षणास उदगीर शहर व ग्रामीण येथील सर्व पोलीस कर्मचारी उपस्थित राहणार असून, ०१ जुलै २०२४ पासून नवीन अंमलात येणाऱ्या भारतीय न्याय संहिता २०२३, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ तथा भारतीय साक्ष संहिता २०२३ या कायद्यावर सखोल मार्गदर्शन दि.२० ते २५ मे या दरम्यान महाविद्यालयाचे प्राध्यापक मंडळी तथा तज्ञ विधीज्ञ करणार आहे.

००००

# सैनिकी विद्यालयाचे एच एस सी परीक्षेत उज्ज्वल यश विद्यालयाचा ९९ टक्के निकाल

उदगीरः महाराष्ट्र राज्य उच्च माध्यमिक मंडळाच्या अर्थात बारावीच्या परीक्षेचा निकाल दि. २१ मे २०२४ रोजी दुपारी एक वाजता जाहीर करण्यात आला. या परीक्षेत सैनिकी विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी उज्ज्वल यश संपादन केले असून विद्यालयाचा ९९ टक्के निकाल लागला आहे.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाकडून फ्फेब्रुवारी आणि मार्च महिन्यात इ. १२ वी च्या विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात आली होती. या परीक्षेत सैनिकी विद्यालयाचे ५७ विद्यार्थी बसले होते , त्यापैकी ५६ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.

सैनिकी विद्यालयातून प्रथम कृष्णा गणपतराव सोनाळे , द्वितीय शिवचरण मिलिंद रुद्रावाड, तृतीय शिवम अशोकराव पोपुलवाड क्रमांक पटकावला आहे. विद्यालयातील सर्वच विद्यार्थी प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले आहेत. इ. १२ वी विज्ञान परीक्षेत यश संपादन केलेल्या सर्वच विद्यार्थ्यांचे व त्यांना मार्गदर्शन करणारे प्राध्यापक विभाग प्रमुख युवराज दहिफ्फळे, प्रा. शिवाण्णा गंदगे, प्रा प्रदीप कोठारे, प्रा. नितीन पाटील, प्रा. सीमा मेहत्रे यांचे अभिनंदन संस्थेचे अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे महाराष्ट्र राज्याचे सरचिटणीस बसवराज म. पाटील नागराळकर, उपाध्यक्ष चंदन पाटील नागराळकर, शालेय समितीचे अध्यक्ष दिलीप पाटील नागराळकर, सहसचिव चेतन पाटील नागराळकर, प्राचार्य वसंत कुलकर्णी, पर्यवेक्षक अरविंद सोनटक्के, सर्वच शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी केले आहे.

०००